# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**<u>दिनांक 27/02/2015 (का.प.क्र.12) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.</u>**

गुरूवार दिनांक 27 फेब्रुवारी 2015 रोजी (का.प.क्र .12) मा.सभापती श्री.विजय वाघचौरे यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समितीची सभा मुख्य कार्यालयातील मलीक अंबर स्थायी समिती सभागृह येथे दुपारी 4.45 वा वंदेमातरम या गिताने सुरू झाली. सभेला मा.अति.आयुक्त श्री.रमेश पवार, नगरसचिव, श्री.एम.ए.पठाण व संबधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

01. स.स.श्री.काशिनाथ हरीभाऊ कोकाटे
02. स.स.श्री.त्र्यबंक गणपतराव तुपे
03. स.स.श्री.अनिल श्रीकिशन मकरीये
04. स.स.श्री.सुरेंद्र माणिकराव कुलकर्णी
05. स.स.श्री.मिर हिदायत अली मिर बसालत अली
06. स.स.श्री.संजय सांडु चौधरी
07. स.स.श्री.जहांगीर खान अब्बास खान
08. स.स.सौ.प्रिती संतोष तोतला
09. स.स.श्रीमती फिरदोस फातेमा

<u>चर्चा :</u>

श्री.त्र्यंबक तुपे :आज मराठी राज्य भाषा दिन आहे या दिना निमित्ताने सर्वांना शुभेच्छा मागिल बैठकीत स्वाईन फ्यु बाबत चर्चा झाली बरीचशी माहिती अधिकारी यांनी दिली त्या संदर्भात उपाययोजना केल्या असे म्हटले होते तरी सुध्दा महाराष्ट्रातील आकडा घेतला असता 800-1000 लोकांचा यामूळे मृत्यू झाल्याचे मिडीयाच्या माध्यमातून समजते.आताच बातमी आली की पत्रकार श्री.रमेश राऊत यांचा स्वाईन फ्यूमूळे मृत्यू झाला व त्यांचे पत्नी सुध्दा ॲडमीट आहे.तीन दिवसात आजार होतो,त्यावर कोणते उपचार होतात, घाटीमध्ये आजही 15-20 रूग्ण आहे.या आजाराचे निदान ज्या प्रमाणे व्हायला पाहिजे तसे होत नाही. हा आजार वाढू नये दुसऱ्यांना लागण होऊ नये यासाठी महापालिकने काय प्रयत्न केले किती रूग्ण या आजाराचे आहे महापालिकेचा कर्तव्य काय आहे त्या रूग्णांना औषधी उपलब्ध करून देतो का? सर्व माहिती दयाी तसेच श्री.राऊत पत्रकार यांचे दु:खद निधन झाले त्यांना सभागृहाच्या वतीने श्रध्दाजंली अर्पण करावी.

श्री.सुरेंद्र कुलकर्णी : यास माझे अनुमोदन आहे.

मा.सभापती :आताच सूचना केल्याप्रमाणे जेष्ठ पत्रकार स्व.रमेश राऊत यांना सभांगृहाच्या वतीने श्रध्दाजंली अर्पण करण्यासाठी उभे रहावे.

या वेळी स्व.राऊत यांना सभागृहाच्या वतीने दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दाजंली अर्पण करण्यात आली.

श्री.त्र्यंबक तुपे :या आजाराने भितीचे वातावरण शहरात आहे. शाळेत मुले जातात त्यांनी व नागरीकांनी काय काळजी घ्यायला पाहिजे मिडीयाच्या माध्यमातून नागरीकांना आवाहन करावे.

श्री.सुरेंद्र कुलकर्णी :जेष्ठ पत्रकार राऊत यांचे या आजाराने निधन झाले त्याच्या पत्नीही आजारी आहे.एक आठवडयात तापाचे, खोकला असलेले रूग्ण वाढले जास्त सिरीयस झाले की डॉक्टर घाटीमध्ये पाठवित आहे यामूळे नागरीक आणखी घाबरून जात आहे. हा आजार होऊन नये यासाठी काय काळजी घ्यायची वर्तमान पत्रात जाहीर प्रगटन करावे.

आरोग्य वैद्य. अधिकारी :पुर्ण महाराष्ट्रात या आजाराचा पादुभाव झाला. जानेवारी पासून उपाययोजना सुरू केली. याआजाराने पहिला मृत्यू 26 जानेवारीला झाला. त्यानंतर सर्व पेपरला आवाहन केलेले आहे, त्या संबधीचे पोस्टर्स तयार केले. नागरीकामध्ये जणजाग्रृती केली.तसेच घाटीचे डॉक्टर खाजगी डॉक्टर व महापालिकेचे मेडीकल ऑफिसर या सर्वांची एकत्रित बैठक घेतली तसेच महापालिकेचे 5 आरोग्य केंद्र या ठिकाणी स्वाईन फ्ल्यु संदर्भात खोकला, ताप संदर्भात जाहीर आवाहन व केंद्र सुरू केले त्याचा कोड नंबर सगळीकडे डिस्प्ले केला व नागरीकांना आवाहन केले की सर्दी खोकला, ताप असेल आणि पाच दिवसा पेक्षा जास्त दिवस ताप असेल व सर्दी, खोकला कमी होत नसेल आणि ज्या भागामध्ये याचा जास्त पादुभाव होत आहे नातेवाईकांना हा आजार असेल तर नजीकच्या आरोग्य केंद्राशी संपर्क साधावा. घाटीमध्ये स्पेशल 10 बेड ठेवले आहे तेथे औषधी व 5 माणसे ठेवले आहे. औषधोपचार करतांना डॉक्टरांना काळजी घ्यावी लागते. त्याचे साठीही महापालिकेने उपलब्ध करून दिले या बरोबर एमजीएम हॉस्पीटमध्ये 10 बेड तयार आहे. कलमनयन बजाज, एमआयटी,धुत तसेच हेडगेवार येथे अथॉराईज सेंन्टर आहे. ट्रिटमेंन्ट सेंन्टर म्हणून बेड शिफ्ट केले आहे.त्याचेकडे महापालिकेने औषध साठा दिलेला आहे.व त्याचेंकडे सुध्दा आहे.शहरात व्हेन्टीलेटरची व्यवस्था पण केली आहे.जर जास्त संख्या वाढली तर त्याची गरज पडणार आहे.आरोग्य केंद्रा मार्फत जणजागृन सुरू केले आहे.आताच म्हटल्या प्रमाणे जेष्ठ पत्रकार यांचा मृत्यू झाला ते पुणे येथून जाऊन आले होते.ज्याचा मृत्यू झाला त्यापैकी किमान तीन लोक तरी पुणे येथे जाऊन आलेले होते.खाजगी रूग्णालयात उपचार घेतहोते सिरीयस झाल्यानंतर दुसऱ्या दवाखान्यात शिफ्ट करण्यात आले. पूर्वी एनआरयू पॉजीटिव्ह असेल तर उपचार करायचे होते आता शासनाने आदेश काढून एसआयएम मेन्टन आणि त्याचे जे नॉर्म्स आहे त्यास स्वाईन फ्यू पॉझीटिव्ह ग्राहय धरून उपचार सुरू करावे.स्वाइन फ्यूचे अे, बी, सी असे तीन गट असतात अे मध्ये सिरीयस असते व्हेन्टीलेटरची गरज असते. बी गटातील रूग्णावर उपचार सुरू करतो केमीकली वाटत असेल की स्वाईन फ्यू आहे. सी गटातील रूग्ण हे संशयीत रूग्ण आहे.ओपीडीमध्ये त्यांचेवर ट्रिटमेंन्ट घेवू शकतात. आजच शासनाकडून सुचना प्राप्त झाली. तुम्ही खाजगी रूग्णालयास विचारणा करा की, कोणते रूग्णावर उपचार करणार आहे त्याची यादी मागवून ॲथाराईज करणार आहे. 1 जानेवारी, 27 फेब्रुवारी पर्यत शासकीय वैदयकीय महाविदयालयात 21 रुग्ण भरती झाले.खाजगी दवाखान्यात 3 असे 24 रुग्ण भरती होते. त्यातील 14 रुग्ण बरे होऊन घरी गेले सध्या घाटी व खाजगी रुग्णालयात आठ रुग्ण उपचार घेत आहे आजचे धरुन चार रुग्णांचा मृत्यू झाला आहे. जनजागृणाची गरज आहे.नागपूर येथे जास्त रुग्ण आढळले होते.त्या भागात गरज असेल तर जावे अन्यथा टाळावे. डेंग्युच्या डास दिसला तर त्यास मारु शकतो परंतु या आजारामध्ये व्हायरस असतो ते दिसत नाही म्हणजे हवेतून खोकल्यास,

शिंकल्यास त्यातून पसरतो.त्यामुळे कन्ट्रोल करणे अवघड आहे.म्हणजे स्वत:हाची काळजी घेणे हा त्यावरील उपाय आहे.अशा वेळी मास लावणे हात धुणे ही काळजी घ्यावी.लहान बाल व 60 वर्षापुढील वयोवृध्द व्यक्ती ज्यांना डायबीटीज आहे अशा तसेच एचआयव्ही बाधीत, गरोदर माता यांचेमध्ये या आजाराचा भादुर्भाव लवकर होतो. यासाठी तातडीने नजीकच्या डॉक्टराशी संपर्क साधून उपचार करावे.हे रुग्ण डायबेटीस होते.ते हार्डडिस्क मध्ये होते दवाखान्यामध्ये घाटी , खाजगी दवाखाने व महापालिकेच्या दवाखान्यात गरोदर माता, बालकासाठी तपासणी सुरु केली 2 महिण्यात 4 हजार रुग्णांची तपासणी केली.

श्री.सुरेद्र कुलकर्णी : तीन दिवसा रुग्ण दगावतो तपासणी केली तर रिपोर्ट लवकर येत नाही.सहा दिवसाच्या कालावधी रुग्णाचा मृत्यू होतो या आजारावर खोलात जाऊन सुसज्ज अशी यंत्रणा तयार करावी माझ्या बाजूला हॉस्पीटल आहे तेथे दोन दिवसापूर्वी सर्दी, तापेचे 4 रुग्ण आहे डॉक्टर सांगतात यांना शिफ्ट करावे लागेल, अशी परीस्थित निर्माण झाली.हा आजार उदभवाणार नाही याची प्रशासनाने दखल घ्यावी जनजागृण करावे.

श्रीमती फिरदोस फातेमा: आरोग्य विभागाने त्याचे पातळीवर प्रयत्न केले आताच खुलासा केला मास वाटप केले माझ्या माहिती प्रमाणे कोणत्याही भागात मास वाटत केले नाही. पॉम्प्लेट वाटप करणार म्हटले, अनेक नागरीकांना वाचता लिहिता येत नाही. त्यासाठी ईलेक्ट्रॉनिक मिडीया जसे एमसीएन वर या आजार होणार नाही तशा प्रकारचे जनजागृन करावे पल्स पोलिओ प्रमाणे घरोघरी जाऊन नर्स, बालवाडी शिक्षक याची मदत घेवून पॉम्प्लेट वाटप करावे.

श्री.त्र्यंबक तुपे :ज्याप्रमाणे पल्स पोलिओ कार्यक्रम राबवतो,डेंग्यु या आजारावर जनजागृण करतो त्यापुढे जाऊन यासाठी काम करण्याची वेळ आली आहे.पुणे नागपूर व गुजरात व इतर राज्यामध्ये सुध्दा मोठे रुग्ण या आजाराचे आढळून येत आहे.बाहेरील नागरीक मोठया प्रमाणात शहरात येतात ते बंद करणे शक्य नाही. खाजगी हॉस्पीटमध्ये पेशंट सिरीयस झाल्यानंतर घाटीमध्ये पाठवितात हे प्रमाण वाढले आहे.अशा डॉक्टराशी संपर्क करुण त्या रुग्णांवर तेथेच उपचार झाले पाहिजे एमसीएन, पेपरच्या माध्यमातून जनजागृन करावे पत्रकार यांचे माध्यमातून,पेपरच्या माध्यमातून काय काय केले पाहिजे, उपाययोजना काय केल्या पाहीजे, बरीचशी माहिती नागरीकांपर्यंत मिळत आहे पत्रकार बंधुचे अभिनंदन करतो आजच्या स्थितीला नागरीक भयभीत झाले आहे कर्मचारी वर्ग वाढवून दयावा हा आजार वाढवू नये याची काळजी प्रशासनाने घ्यावी.

आरोग्य वैदय.अधिकारी:कालच एमसीएन वर जनजागृण सुरु केले.रेडीओ मिरची वरून प्रसारसाठी दिले या विभागाचे बरेच कर्मचारी निवडणुकीच्या कामासाठी दिले ते परत मिळावे काम सुकर करता येईल.

श्री.त्र्यंबक तुपे :या विभागाचे कर्मचारी परत पाठवावे.

श्री.अनिल मकरिये :नागरीक मरत आहे निवडणूका रद्य केल्या पाहिजे.

श्री.सुरेंद्र कुलकर्णी :हा आजार वाढल्या नंतर आटोक्यात येणे शक्य नाही.तातडीने उपाययोजना कराव्यात.

मा.सभापती :जेष्ठ पत्रकाराचा या आजाराने मृत्यू झाला. आरोग्य विभागाची जी मदत लागेल ती देणार आहोत. जे पथक तयार करावयाचे आहे आरोग्य विभागाचे जे कर्मचारी

निवडणुकीच्या कामासाठी आहे त्यातील जे आवश्यक कर्मचारी आरोग्य विभागाकडे परत दयावे खाजगी रुग्णालयात येणारे रुग्णावर उपचार केले पाहिजे तसे सुचना त्या डॉक्टरांना दयाव्यात मिडीयाच्या ,पेपरच्या माध्यमातून या आजाराची लागण होणार नाही त्या बाबत घ्यावयाची काळजी या संबधी जाहीर प्रगटन दयावे

श्री.मीर हिदायत अली :पॅचवर्कच्या संदर्भात मागिल बैठकीत चर्चा झाली वार्ड सी मध्ये 50 लक्षचे काम होते 90 टक्के काम केल्याचे म्हटले होते चंपा चौक ते दर्गा पुढे कटकटगेट, तसेच चंम्पाचौक ते रोषण गेट या रस्त्यावर मोठे खड्डे पडले अपघात होत आहे पुर्ण ट्रॉफिक जाम होते कुठे काम केले खुलासा घ्यावा.

श्री.अनिल मकरिये :अधिकारी उपस्थित नसतात बैठक घेवून उपयोग नाही

श्री.संजय चौधरी :आचारसहिंता लागणार आहे वार्डातील कामे व्हावी अधिकारी सभेला उपस्थित नसतात.हे बरोबर नाही.

श्री.मीर हिदायत अली : काही वॉर्डात दररोज तर काही भागात शहरात 2 दिवसा आड पाणी येते आमच्या 15 वार्डात त्यात राजाबाजार भाग आहे केवळ महिण्यातून 2-3 दिवस पाणी येते 6 दिवसानंतर पाणी येत आहे हा भेदभाव का होतो.

श्री.जहागीर खान :शहागंज भाजी मंडई येथील कचरा उचलला जात नाही 6-7 दिवसा आड पाणी येत आहे 15-20 मिमिटेपाणी येते त्यात ड्रेनेजचे पाणी मिक्स होऊन येते याकडे कुणी लक्ष देत नाही.

श्रीमती प्रिती तोतला :दोन दिवसा आड पाणी पुरवठा होत आहे शहांगजच्या टाकीवरुन जे वार्डास पाणी दिले जाते ते 8 व्या दिवशी येत आहे. एक महिण्यापासून ही परीस्थिती आहे.

श्री.सुरेद्र कुलकर्णी :ब-याच भागात 6-7 दिवसानंतर पाणी येत आहे नागरीकांचे फोन येतात. कोणत्या दिवशीचे पाणी केंव्हा येते कळायला मार्ग नाही पुर्ण पाण्याचे नियोजन कोलमडले. कोणता टप्पा केंव्हा ते कळत नाही.8-10-15 दिवसापासून हे होत आहे.या बाबत ठोस निर्णय घ्यावा.

श्रीमीर हिदायत अली :काही वार्डात दररोज पाणी येते.तेथून पाण्याच्या लाईन येतात त्या वार्डात नियमित पाणी चालू राहते.श्री.पदमे जे. ई बोलवल्यानंतर हजर असतात परंतु त्यांना अधिकार दिले नाही. क्रांतीचौक पासुन दोन बाजुने लाईन बायपास होते गांधीपुतळयाकडे लाईनला अडथळे येत आहे.

श्री.जहागीर खान :15 मिनिटे पाणी येते 5-10 दिवसानंतर पाणी सोडले जाते तरी पाणी पुरेसे नाही.

श्री.मीर हिदायत अली :शहांगज टाकीवर सकाळी 8 वाजता कार्य.अभियंता श्री.कोल्हे यांनी सर्वांना समजावून सांगितले त्यानंतर पाणी सोडण्यास सांगितले 5 वार्डास वाटप केले त्यातही गडबड झाली त्यानंतर नेहरुनगरचे लोक टाकीवर आले चिडलेले होते.

श्रीमती प्रिती तोतला :50-60 नागरीक तिकडच्या भागाचे आले. जेथे पाणी चालू होते तिकडे न जाता गांधीपुतळा जवळील वॉलची चावी लावून पाणी बायपास केले जाते, चावी त्याचेकडे कुणी दिली. हे अधिकार त्यांना दिले का?

श्री.काशिनाथ कोकाटे :ज्यांना खुलासा मागतो त्यांचे अधिकार नाही.ज्या ज्या ठिकाणी 150,250 एमएम च्या जलवाहिण्या टाकणे आहे एकही मीटर पाईप एजन्सीने आणले नाही.एजन्सीला परत पाठविणार अशा बातम्या येतात हा निवडणुकीपुरता विषय करीत आहोत का निवडणूक येईल, होऊन जातील. उन्हाळयाचे दिवस आले लोकांना पाणी नाही. एखादे चोकअप काढायचे झाल्यास एजन्सीकडे पाईप नाही. समांतरवर दोन दिवस सभा चालली चर्चा झाली वरिष्ठ पातळीवरही चर्चा झाली परंतु आऊटपुट शुन्य आहे

ज्यांना अधिकार आहे त्यांना विचारणा करावी.मंत्रालयापर्यंत हा विषय गेला जे.ई., उपअभियंता यांना विचारणा करणे योग्य नाही.संमातरचे अधिकारी व मनपाचे अधिकारी यांची बैठक बोलवावी.लागणारे साहित्य आवश्यक आहे सर्व पुरवठा करावा मनपाकडे होते तेंव्हा पाणीपुरवठा -1-2 असे विभाग होते.दोन्हीचे गोडाऊन वेगवेगळे होते. सर्व साहित्य होते. परंतु या एजन्सीकडे स्टोअर उपलब्ध नाही.25 टँकर चालू होते एजन्सीचे 150 टँकर चालू आहे. त्यावर बंधन नाही. रू.1000/- मध्ये विकले जाते. बाजूच्या भागाचे लोक सुध्दा विकत पाणी घेतात.लिगल वसाहत आहे, नळ कनेक्शन ज्यांचेकडे आहे त्यांना पाणी नाही.व्यवसायासाठी पाणी विकले जाते यासाठी वरिष्ठ अधिकारी कार्य.अभियंता अधिक्षक अभियंता व संमातरचे इनचार्ज जे असतिल त्यांचे सोबत बैठक घ्यावी.त्यांचे साहित्य कुठे आहे गोडाऊन कुठे आहे तपासावे.ही कंपनी पैसे कमवायला आली कमीत कमी खर्चात कंपनी लोकांकडून जास्त काम करुन घेत आहे हे जोखमीचे काम झालेले आहे.संबधीत अधिकारी यांच्या कडून खुलासा घ्यावा.

श्री.संजय चौधरी :सक्षम अधिकारी यांचेकडून खुलासा घ्यावा़

क.अभियंता(श्री.पदमे) :हर्सुल तलावाचे पाणी पुर्णपणे बंद झाले आहे तेथून 5 एमएलडी पाणी मिळत होते शहागंज टाकीवरुन दोन दिवसा आड दिले जाणारे पाणी 11 एमएलडी होते.यामुळे शहागंजच्या टाकीवरुन आता 2 दिवसा आड ऐवजी 3 दिवसा आड पाणी दिले जाते.तसेच 20 तारखेला जे शटडाऊन झाले होते त्यामूळे पाणी पुरवठा विस्कळीत झाला याची माहिती कंपनीकडे दिली आहे वारंवार कंपनीच्या संपर्कात मी आहे. कंपनीमध्ये श्री.मोदनवाड म्हणून मुख्य वितरण अधिकारी आहे. स.श्री.जहागींर खान यांचे वार्डातील घाण पाण्या संदर्भातही कंपनीच्या लोकांना दाखवून दिले आहे.

श्री.मीर हिदायत अली : श्री.मुजूमदार बादशाह आहे. कंपनीचे लोक नाटक करीत आहे कोणतेही काम करीत नाही.

श्रीमती प्रिती तोतला :आमच्या वार्डात पाणी येते त्या वेळेस दुसऱ्या काही वार्डात ही पाणी दिले जाते त्या वॉर्डात दोन वेळा पाणी जाते, यावर उपाययोजना का करीत नाही.

श्री.काशिनाथ कोकाटे :मिडीयाच्या माध्यमातून वाचले की मनपाने पाणीपुरवठा कंपनीकडून हस्तांतरण करून घेतला हे सत्य आहे का?

मा.सभापती :संबधीत अधिकारी उपस्थित नाही याची माहिती नंतर घेता येईल.

श्री.त्र्यंबक तुपे : हर्सुल धरणातील पाणी संपत आहे हे लक्षात आले असेल तेंव्हाच पर्यायी व्यवस्था नियोजन का केले नाही. विहीर अधिगृहीत करायला पाहिजे होते.धरणातील पाणी संपले तर त्या नागरीकांना पाणी देणार नाही का? यापुर्वी अनेकदा पाणी संपले आहे पर्यायी व्यवस्था केली होती.कंपनीला नोटीसा दिल्या जातात त्यावर कंपनीचे म्हणणे काय सर्वामध्ये सभ्रम निर्माण होतो.2-3 दिवसाच्या आत समांतरचे अधिकारी मनपाचे अधिकारी यांची एकत्रित बैठक घेवून योग्य निर्णय घ्यावा.

श्री.संजय चौधरी :12 दिवसापासून माझ्या वार्डात पाणी येत नाही 6 फुट पाईप लावण्याचे काम कंपनी करीत नाही.कंपनीकडे पाईप नाही.कंपनीचे लोक फोन घेत नाही.

श्री.मीर हिदायत अली :शहागंज टाकीवर अनेक नागरीक आहे. त्यांना समजावून सांगितले कमीत कमी 20 वार्डाचे नागरीक पाण्यासाठी आले होते. यानंतर गंभीर परीस्थिती निर्माण होऊ शकते.

श्री.काशिनाथ कोकाटे :5 कोटी देण्याचे बदं केले असेल तर त्यातून विकास कामासाठी लागणारे मटेरियल पर्चेस करण्याचे आदेशीत करावे व जे कामे अर्धवट राहिली ते करावे.2-3 दिवसात समांतरचे अधिकारी मनपाचे अधिकारी स.सदस्या सोबत बैठक घेवून योग्य निर्णय घ्यावा.

श्री.जहागीर खान :वार्ड 27 मध्ये पाईप लाईन टाकली वॉल पुर्ण ओपन केला जात नाही 15 मिनिटे पाणी येत आहे. येथील पाणी मरीमाता येथुन येते. हर्सुलचा संबंध नाही.

श्री.मीर हिदायत अली :कंपनीला 5 कोटी रूपये देऊ नये त्यातून विकास कामे करावे मा.महापौरांनी आदेशीत केले होते त्याच बरोबर या सभागृहाने सुध्दा निर्णय घेतला होता की कंपनीला पैसे देऊ नये अमलबजावणी का केली नाही.

श्री.संजय चौधरी :कंपनीला दयावयाचा 15 कोटीचा धनादेश तयार आहे.

श्री.मीर हिदायत अली :कंपनीला डायरेक्ट त्यांचे खात्यावर पैसे जमा होतात लेखा विभागाला आदेशीत करावे की पैसे देऊ नये.

श्रीमती प्रिती तोतला :अधिकारी उपस्थित नाही. पाणीपुरवठयासाठी विशेष सभेचे आयोजन करावे.

श्री.सुरेद्रं कुलकर्णी :प्रत्येक भागात सुरळीत पाणी दयावे.3-4 दिवस पाणी येत नाही पाण्याला प्रेशर नसते.प्रत्येक बैठकीला चर्चा करणार काय माझ्या वार्डात 15 दिवसापासून लाईन फुटली.फोन केला असता काम केले जाईल अशी उत्तरे मिळतात काम का होत नाही.

मा.सभापती :शहरात पाण्याची गंभीर परीस्थिती आहे. शहरातील घाण पाण्या विषयी जे काम असेल ते ताबडतोब करावे व कंपनीचे पैसे कपात करावे.सभापती दालनात सोमवारी या संदर्भात बैठक घेतली जाईल.

श्री.मीर हिदायत अली :शहागंज मध्ये 5 दुकानास आग लागली होती त्यात एकाचे 40 हजार जळून खाक झाले.त्यांनी 8.22 मि.नी फोन केला मी अग्निशमन अधिकारी यांना फोन करून गाडी मागितली त्यानंतर 1 तासाने गाडी आली.त्यापुर्वी तेथे असलेले ऑपरेटर यांनी पाणी नसल्याचे सांगितले होते सत्य परीस्थिती काय होती माहिती दयावी.

मुख्य अग्निशमन अधि. :अग्निशमन विभागास 8.21 मि.नी पहिला कॉल आला.मी कन्ट्रोलला काल दिला 8.34 मि.नी गाडी बाहेर पडली दुसरी गाडी 8.40 मिनिटानी बाहेर पडली कारण इतर कॉल आलेले होते. दोन्ही गाडया पाठवून तेथील आग विझवली या गाडीमध्ये नियमीत पाणी असते.

श्री.मीर हिदायत अली :फोन ट्रेस केलेला आहे सदरील कर्मचारी यांचा आवाज ऐकू येतो,की पाणी नाही.जे कर्मचारी असेल त्यांचेवर कार्यवाही करावी.

मुख्य अग्निशमन अधि. :27 वर्षाच्या नोकरीमध्ये असे कधीही झाले नाही की या गाडयामध्ये पाणी नाही.

श्री.मीर हिदायत अली :घराला आग लागली फोन केला तर बघून घेतो आमचा पगार नाही अशी उत्तरे कर्मचारी देतात.जे काम करतात त्यांना मोबदला मिळाला पाहिजे तो मिळत नाही असे कर्मचा-यांचे म्हणणे आहे.रेकॉर्ड मध्ये आले.

अग्निशमन अधिकारी :शहागंज मध्ये जातांना उशीर झाला असेल परंतु 1 तास उशीर झालेला नाही 101 नंबरवर कॉल केला तर तो उल्हासनगरला लागतो.अग्निशमन दलास 2334000 या नंबरवर कॉल जातो.

श्री.मीर हिदायत अली :मी स्वतः ऑफिसला जाऊन आलो कर्मचारी सांगतात कामाचा मोबदला मिळत नाही.जे काम करतात त्यांना मोबदला दिला पाहिजे.यात ज्यांनी चुक केली त्यांचेवर कार्यवाही व्हावी.

अग्निशमन अधिकारी :जो आवाज रेकॉर्ड केला तो या विभागाचा नाही.

मा.सभापती : आताच जो मुद्दा उपस्थित केला त्या संबधी जे दोषी असेल चौकशी करून ज्याचा आवाज असेल, चौकशी करून अहवाल द्यावा.

श्रीमती प्रिती तोतला : कलम 54 (1) मध्ये काय तरतुद आहे आस्थापनाशी संबधीत विषय आहे खुलासा करावा.

आस्थापना अधिकारी-1 :महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे 54 (1) चे कलमामध्ये मध्ये कर्मचारी निवड समिती गठीत करणे संदर्भात आहे.

श्रीमती प्रिती तोतला :54(1)कलमान्वये जर ठराविक कर्मचारी नियुक्ती केली असेल तर समुदाय संघटकाची किती पदे मंजूर आहे.

आस्थापना अधिकारी-1 :मनपा आस्थापनेवर सध्या दोन समुदाय संघटक श्री.सुबेवाड व बैले म्हून कार्यरत आहे.तसेच श्रीमती गायकवाड व श्रीमती सुरडकर यांना मानधनावर तात्पुरतत्या स्वरूपात घेण्यात आले आहे.

श्रीमती प्रिती तोतला :दोन जागा रिक्त असेल व 54(1) नुसार निवड केली असेल तर त्यांना तात्पुरत्या स्वरूपात का नियुक्त केले जाते.

आस्थापना अधिकारी-1: निवड समिती गठीत केली नाही वेगवेगळया पदासाठी जेंव्हा समिती गठीत होईल तेंव्हा विचार केला जाईल.सन 1992-93 पासून या महिला तात्पुरत्या वेतनावर कार्यरत आहे.

श्रीमती प्रिती तोतला :92-93 पासून या महिला कार्यरत आहे 23 वर्ष सेवा केली 50-55 वर्ष त्यांचे आता वय असेल 2-3 वर्षात त्या निवृत्त होतील, तरीही तात्पुरत्या स्वरूपात नियुक्ती, त्यांना समाविष्ट का केले नाही या कर्मचा-यांची तात्पुरती स्वरूपात अटी शर्तीनुसार केली परंतु त्यांचे वेतन सुध्दा त्या त्या प्रमाणे उक्त अटी व शर्तीनुसार ज्या विभागाने दिलेले आर्थीक व भौतिक उद्दिष्ठ पुर्ण केले असेल तर त्यांना 200/- ही नियमीत वेतनवाढ करण्यात आली तर मनपा सेवेत समाविष्ट का करण्यात आले नाही.

आस्थापना अधिकारी-1 :अगोदर सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना होती एप्रिल पासून A.U.N.M. योजना यामध्ये रूपांतरीत झाली.मार्च 2013 मध्ये श्रीमती सुरडकर व गायकवाड याचें मानधन हे जिल्हाधिकारी कार्यालयाकडून वाटप झाले.

श्रीमती प्रिती तोतला :शिक्षण विभाग व आरोग्य विभागात शासनाचे 50 टक्के ग्रॅण्ड शासनाकडूनच येते. जर ती योजना आता नाही तर यापुर्वी त्या संबधीचे कार्यालय महापालिकेत का होते.

आस्थापना अधिकारी-1 :ही योजना शासन स्तरावर महापालिका क्षेत्रासाठी राबविली जाते या कर्मचा-यांना तात्पुरत्या स्वरूपातच घेतलले आहे.रिक्त पदे व सिनेरिटीनुसार त्यांचा अहवाल प्रकल्प संचालक यांचेकडे सादर केला आहे.

श्रीमती प्रिती तोतला :मनपा आस्थापना आदेश क्रमांक 4628/92 दिनांक 4-12-1992 नुसार श्रीमती अहील्याबाई खोडके व श्रीमती सिधुबाई सुरडकर यांनी समुदाय संघटक म्हणून 1200 रू वर नियुक्ती दिली त्यानुसार 1996 मध्ये त्यांचे मानधनामध्ये वरच्यावर नियमीत वाढ केली.तर दोन पदे रिक्त असतांना त्या महिलावर अन्याय का होतो त्यांना इतरत्र दुसरीकडे आता काम मिळणार नाही त्यांना त्याचे हक्काचा मोबदला मिळावा.

आस्थापना अधि.-1 : जिल्हाधिकारी कार्यालयाकडे शासन निर्णयाप्रमाणे समुदाय संघटकाची पदे मंजूर आहे. हा प्रोजेक्ट कलेक्टरकडे गेला होता. या पदाचा प्रस्ताव परस्पर

| | |
|---|---|
| | जिल्हाधिकाऱ्याकडे परस्पर गेलेला आहे. दोन समुदाय संघटीका यांचा जेष्ठतेनुसार तसा प्रस्ताव दाखल करायला पाहिजे होता.तसे झालेले नाही.आता मा.आयुक्त हे मा.जिल्हाधिकारी यांचे चर्चा करून निश्चित या बाबत काय पॉलीसी ठरविता येईल त्यानुसार कार्यवाही केली जाईल. |
| श्रीमती प्रिती तोतला | :या महिलांना 4 महिण्यापासून वेतन दिले नाही. |
| मा.सभापती | :निवड समिती आहे त्याचे मार्फत कार्यवाही करावी. |
| आस्थापना अधिकारी-1 | :या बाबत मा.आयुक्त व उपआयुक्त यांना अहवाल सादर करून लवकरच निर्णय घेतला जाईल. |
| मा.सभापती | : 4 महिण्यापासून या कर्मचा-यांना पगार नाही 22 वर्षापासून त्या काम करीत आहे. लोकांचे हराशमेंट, काम करीत नसेल तर बदली करा. |
| आस्थापना अधिकारी-1 | :या बाबत संचिका सादर केली आहे.प्रलंबीत नाही. |
| श्री.संजय चौधरी | :1 महिण्यापासून लाईटचे ठेकेदार यांना फोन करतो वार्डात लाईट लावावे तर बील मिळत नाही अशी उत्तरे मिळतात. |
| उपअभियंता(विद्युत) | :एक आठवडयात ठेकेदारास बिल अदा होईल काम चालू केले आहे.स.सदस्य श्री.चौधरी यांचे इतर वार्डातील लाईटचे काम करण्यात येईल. |
| श्री.त्र्यंबक तुपे | :लाईटच्या समस्या प्रत्येक वार्डात आहे.किती दिवसाची मुदत आहे. मुदतवाढ देणार का?माझ्या माहिती प्रमाणे मुदत संपली तरी कामे करून घेत असतो.तसा प्रस्ताव यायला पाहिजे होता. काम करून घेत असेल तर पेमेंन्ट सुध्दा देण्यात यावे. |
| मा.सभापती | :वार्डातील लाईट बंद असेल तर त्या संबधीची सर्व कामे करण्यात यावी. |
| श्री.मीर हिदायत अली | :वार्ड क मध्ये पॅचवर्कची कामे कोठे केली. |
| श्री.जहागीर खान | : कटकटगेट भागात रस्त्याचे पॅचवर्क होत नाही एका महिलेचा खड्डयामुळे पडून प्रसुती झाली.तात्पुरते माती मुरूम तरी टाकावे. |
| श्री.मीर हिदायत अली | :वार्ड क मध्ये 50 लक्षचे पॅचवर्कचे काम आहे. वार्ड क मध्ये क्षेत्रफळ कमी आहे.काही रस्ते डिफर मध्ये झाले परंतु चंपाचौक ते दर्गा ते कटकट गेट पर्यत मोठे खड्डे झाले पॅचवर्क चे काम करण्यात यावे. |
| वार्ड अभियंता (क) | :या रस्त्याचे पॅचवर्क करणे आवश्यक आहे दोन दिवसात काम केले जाईल पॅचवर्कचे कामाचे टेडंर होते. ठेकेदारास पेमेंन्ट न दिल्यामूळे काम करण्यास तयार नाही.आता काम करण्याची मुभा दिली आहे. |
| श्री.मीर हिदायत अली | :मोठे काम नाही 3-4 गाडी मटेरियल आणले तरी काम होईल.किती रक्कमेचे बिल दिले आहे. |
| मा.सभापती | :आताच सुचना केल्याप्रमाणे त्या भगातील पॅचवर्कचे काम तातडीने करावे. |
| वार्ड अभियंता -क | :46 लक्षचे बील आहे. |
| श्री.मीर हिदायत अली | :बोगस बील दिले आहे.कोणत्या रस्त्याचे काम माहिती दयावी. |
| वार्ड अभियंता -क | :कोणत्या रस्त्याचे काम केले त्याची यादी यामध्ये आहे आवश्यक असेल तर यादी दिली जाईल. |
| श्री.त्र्यंबक तुपे | :ज्या ज्या वार्डात काम चालू असते, तेंव्हा त्या सदस्यांच्या निदर्शनास आणूल दिले जावे असे ठरले होते 46 लक्षचे काम कोठे झाले चौकशी करावी. |
| मा.सभापती | :46 लक्षचे कामे वार्ड क मध्ये कोठे केली तेथील रस्त्याचे फोटोसह यादी नकाशे त्या वार्डाचे स.सदस्यांचे पत्र घेतले होते का या सर्वाची पुर्तता केली होती का पुढील बैठकीत चौकशी करून माहिती सादर करावी. |

**विषय क्र. 109 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.02 मधील जळगाव रोड ते मयुरपार्क पर्यंतच्या रस्त्याचे पुनर्डांबरीकरण करणे. या कामाचे सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन 2011-2012 च्या दरसुचीनुसार र.रू.36,73,201/- चे अंदाजपत्रकास मान्यता होऊन कामाच्या निविदा मागविण्यात आल्या असता एकुण (04) चार निविदा प्राप्त झाल्या त्या खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नाव | प्राप्त निविदा दर |
|---|---|---|
| 01. | मे.अरोरा कन्स्ट्रक्शन | 2.12 % अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराने |
| 02. | मे.ए.एस.कन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकीय दराने |
| 03. | मे.एम.ए.सिद्दीकी | 4 % अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्त दराने |
| 04. | राजेंद्रसिंग अजितसिंग | 6.66 % अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्त दराने |

करीता वरील प्राप्त निविदापैकी सर्वात कमी दराची निविदा मे.अरोरा कन्स्ट्रक्शन यांची असून, ती अंदाजपत्रकीय दरापेक्षा 2.12 % कमी दराची आहे. त्यास दिनांक 18/11/2014 चे मान्यतेनुसार मा.स्थायी समिती समोर मान्यतेस्तव सादर करण्यासाठी शिफारस केली आहे.

तथापी मे.अरोरा कन्स्ट्रक्शन यांची उपरोक्त कामाची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 2.12 % कमी दराची निविदा मा.स्थायी समिती समोर मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

मा.सभापती : विषय क्र.109,110,111,112,113,मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,वार्ड क्र.02 मधील जळगाव रोड ते मयुरपार्क पर्यंतच्या रस्त्याचे पुनर्डांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा 2.12 % कमी दराची मे.अरोरा कन्स्ट्रक्शन यांच्या निविदेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 110 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.02 मधील भगतसिंगनगर रस्ता ते म्हसोबा मंदीर व भगतसिंगनगर रस्ता ते मयुरपार्क पर्यंतच्या रस्त्याचे मजबुतीकरण करून डांबरीकरण करणे. या कामाचे सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन 2013-2014 च्या दरसुचीनुसार र.रू.48,52,126/- चे अंदाजपत्रकास मान्यता होऊन कामाच्या निविदा मागविण्यात आल्या असता एकुण (03) तीन निविदा प्राप्त झाल्या त्या खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नाव | प्राप्त निविदा दर |
|---|---|---|
| 01. | मे.ए.एस.कन्स्ट्रक्शन | 3 % अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराने |
| 02. | मे.अरोरा कन्स्ट्रक्शन | 0.77 % अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराने |
| 03. | मे.एम.ए.सिद्दीकी | 8 % अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्त दराने |

करीता वरील प्राप्त निविदापैकी सर्वात कमी दराची निविदा मे.ए.एस.कन्स्ट्रक्शन यांची असून, ती अंदाजपत्रकीय दरापेक्षा 3 % कमी दराची आहे. त्यास दिनांक 18/11/2014 चे मान्यतेनुसार मा.स्थायी समिती समोर मान्यतेस्तव सादर करण्यासाठी शिफारस केली आहे.

तथापी मे.ए.एस.कन्स्ट्रक्शन यांची उपरोक्त कामाची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 3 % कमी दराची निविदा मा.स्थायी समिती समोर मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.02 मधील भगतसिंगनगर रस्ता ते म्हसोबा मंदीर व भगतसिंगनगर रस्ता ते मयुरपार्क पर्यंतच्या रस्त्याचे मजबुतीकरण करून डांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा 3 % कमी दराची मे.ए.एस.कन्स्ट्रक्शन यांच्या निविदेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 111 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.70 गजानन महाराज मंदिर ते तिरूमला मंगल कार्यालयापर्यंत दुभाजक बांधणेच्या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन 2011-2012 च्या दरसुचीनुसार र.रू.2479985/- चे अंदाजपत्रक असुन सदरील कामाचा खर्च वार्ड अंतर्गत विविध विकास कामे या लेखाशिर्षामधुन प्रस्तावित आहे. सदर कामासाठी निविदा पत्रके मागविली असता, एकुण (एक) निविदा प्राप्त झाली व प्राप्त निविदा उघडण्यात आली असता त्यात खालीलप्रमाणे दर भरून प्राप्त झाले आहेत.

| अ.क्र. | निविदा धारकाचे नाव | निविदा दर (अंदाजपत्रकीय दरापेक्षा) |
|---|---|---|
| 01. | मे.आदिनाथ कन्स्ट्रक्शन | 34.89 % जास्त दराने |

वरीलप्रमाणे प्राप्त निविदा तुलनात्मकदृष्ट्या व अंदाजपत्रकीय दरापेक्षा 34.89% जास्त दराची मे.आदिनाथ कंन्स्ट्रक्शन यांची निविदा प्राप्त आहे. सदर दर जास्त वाटत असल्याने संबंधीत ठेकेदारास दराच्या वाटाघाटीस बोलाविले असता संबंधीताने अंदाजपत्रकीय दरापेक्षा 34.89% जास्त दरा ऐवजी अंदाजपत्रकीय दरापेक्षा 15% जास्त दराने काम करण्यास संमती दर्शविलेली आहे. अंदाजपत्रकीय दरापेक्षा 15% जास्त निविदा दरास मा.आयुक्त यांनी मंजुरी दिलेली आहे. प्रस्तावित कामावर रक्कम रू.2851983/- एवढा खर्च अपेक्षित आहे.

तरी मे.आदिनाथ कंन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 15% जास्त दराची निविदा व होणारा खर्च मा.स्थायी समितीच्या मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.70 गजानन महाराज मंदिर ते तिरूमला मंगल कार्यालयापर्यंत दुभाजक बांधणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा 34.89% जास्त दराचे निविदाधारक मे.आदिनाथ कंन्स्ट्रक्शन यांचेशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार अंदाजपत्रकीय दरापेक्षा 34.89% जास्त दरा ऐवजी अंदाजपत्रकीय दरापेक्षा 15% जास्त दराने मे.आदिनाथ कंन्स्ट्रक्शन यांचेकडून सदर काम करून घेण्यास व रक्कम रू.2851983/- एवढ्या अपेक्षित खर्चासह सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 112 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.28 नेहरूनगर येथे विविध ठिकाणी डांबरीकरण करणे करीता सा.बां.विभागाच्या सन 2011-12 च्या जिल्हा दरसुचीनुसार रक्कम रू.2999612/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन सदरील कामाचा खर्च सन 2013-14 अंतर्गत मा.सर्वसाधारण सभेचा ठराव क्रमांक 84 दिनांक 19/01/2013 अन्वये लेखाशिर्ष बदलाच्या ठरावानुसार नवीन डांबरी रस्ते शहरी भाग या लेखाशिर्षा अंतर्गत उपलब्ध तरतुदीनुसार करण्यात येईल. मा.आयुक्त महोदय यांनी सदरील अंदाजपत्रकास मान्यता दिल्यानुसार सदरील कामासाठी ई निविदा विभागामार्फत निविदा मागविण्यात आल्या असता एकुण 3 निविदा दर भरून प्राप्त झालेल्या आहेत. त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | गुत्तेदाराचे नाव | निविदा दर |
|---|---|---|
| 01. | ए.एस.कन्स्ट्रक्शन | 11 % जास्त दराने |
| 02. | एम.ए.सिद्दीकी | 16 % जास्त दराने |
| 03. | आदिनाथ कन्स्ट्रक्शन | 29.85 % जास्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा 11% जास्त दराची निविदा ए.एस. कन्स्ट्रक्शन यांची प्राप्त झाली आहे. तथापी दराबाबतच्या वाटाघाटी अंती अंदाजपत्रकीय दरापेक्षा 11% जास्त दराऐवजी 10% जास्त दराने प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे.

त्यानुसार सदर कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.2999612/- व ए.एस. कन्स्ट्रक्शन यांची प्राप्त निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा 11% जास्त ऐवजी 10% जास्त दराचा निविदा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.28 नेहरूनगर येथे विविध ठिकाणी डांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा 11% जास्त दराचे निविदाधारक ए.एस. कन्स्ट्रक्शन यांचेशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार अंदाजपत्रकीय दरापेक्षा 11% जास्त दराऐवजी 10% जास्त दराने ए.एस. कन्स्ट्रक्शन यांचेकडून सदर काम करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 113 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.09 अंतर्गत नंदनवन कॉलनी येथील खुली जागा विकसीत करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.49,97,213/- च्या अंदाजपत्रकास मा.स्थायी समिती विषय क्र.73 दिनांक 03/09/2014 अन्वये मान्यता प्राप्त झालेली आहे. मान्यतेनुसार सदरील कामाकरीता निविदा मागविण्यात आली असता ई-टेंडर विभागाच्या अहवालानुसार एकुण 04 कोऱ्या निविदा विक्री झाल्या व निविदा पत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत सदरील चारही निविदा दर भरून प्राप्त झाल्या. प्राप्त निविदा उघडण्यात आल्या असता, त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| 01. | मे.एशियन कन्स्ट्रक्शन | - | 14.49 % कमी दराने |
| 02. | के.बी. पाथ्रीकर | - | 11.79 % कमी दराने |
| 03. | कुरैशी मोहंम्मद अब्दुल खलील | - | 8.56 % कमी दराने |
| 04. | अब्दुल कदीर शेख रहीम | - | 5.16 % कमी दराने |

वरील प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा 14.49 % कमी दराची मे.एशियन कन्स्ट्रक्शन यांची निविदा आहे. सदर अंदाजपत्रकामध्ये मैदानावर पेव्हर ब्लॉक्स लावणेची तरतुद आहे. सदर पेव्हर ब्लॉकमुळे पावसाचे पाणी जमीनीत मुरण्यासाठी प्रतिबंध होतो. जमीनीत पाणी मुरले पाहिजे त्या करीता इतःपर मोकळया जागांमध्ये पेव्हर ब्लॉक लावणेची कामे करू नयेत असा निर्णय घेण्यात आलेला आहे. तरी या अंदाजपत्रकातील पेव्हर ब्लॉक लावणेची बाब वगळुन इतर कामे करण्यात येतील.

तरी सदरील काम मे.एशियन कन्स्ट्रक्शन यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा 14.49 % कमी दराने करून घेणेबाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.09 अंतर्गत नंदनवन कॉलनी येथील खुला जागा विकसीत करणेच्या कामासाठी (**अंदाजपत्रकातील पेव्हर ब्लॉक लावणेची बाब वगळून इतर कामे करावीत**) प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा 14.49% कमी दराची मे.एशियन कन्स्ट्रक्शन यांच्या निविदेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 114 :**

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद मा.स्थायी समिती सभेसमोर प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, मौजे गारखेडा येथील न.भु.क्र.15306/1 रिलायन्स मॉल लगतचे इमारतीमधील समावेशक आरक्षण विकासातंर्गत एकुण बांधकामापैकी 2447.00 चौ.मी. ऐवढे क्षेत्रफळ महानगरपालिकेस हस्तांतरीत केले आहे. या बांधकाम G+3 असुन यामध्ये एकुण 16 हॉल/दुकाने आहेत. हॉलचे/दुकानांचे प्रत्येकी क्षेत्र साधारणतः 153.00 चौ.मी. एवढे आहे. बांधकाम झालेली इमारत मधील पुर्वेकडील तळमजला हॉल साई सेवा बहुउद्देशिय संस्था, औरंगाबाद यांनी भाडे तत्वावर मिळणेसाठी विनंती केली आहे. साई सेवा बहुउद्देशिय संस्था औरंगाबाद यांना शिध्द शिघ्र गणकानुसार भाडे आकारणी करून भाडेतत्वावर देणेसाठी प्रशासकीय मान्यता झालेली आहे. त्यानुसार सदर हॉलसाठीचे क्षेत्रफळ 153.00 चौ.मी. साठी शिध्द शिघ्र गणकानुसारचे मासिक भाडे रू.53,397/- एवढे होते.

त्यानुषंगाने संस्थेच्या मागणीनुसार रिलायन्स मॉल लगतच्या इमारतीमध्ये पुर्वे बाजुचा तळमजला हॉल साई सेवा बहुउद्देशिय संस्था, औरंगाबाद यांना शिध्द शिघ्र गणकानुसार भाडेतत्वावर देणेसाठीचा प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

श्री.सुरेंद्र कुलकर्णी :2447 चौ.मी म्हणजे किती स्क्वे. फुट होते. या साठी जाहिरात दयावी लागते का नियमाप्रमाणे असे देता येते का हा ठराव होतो का? खाजगी संस्थेला कशा पध्दतीने देता येते. नियमाने बरोबर आहे का? रद्य करावे.

मालमत्ता अधिकारी :रिलायन्स मॉल लगतचे इमारतीमधील समावेशक आरक्षण विकासांतर्गत 2447 चौऱ्मी म्हणजे 25हजार स्क्वे.फुट मनपास हस्तांतरीत झालेले आहे.तेथे 16 हॉल आहे एक हॉल 153 चौ.मी.चा हॉल 1500 स्क्वे.फुट चा या संस्थेने मागणी केली आहे.

श्री.अनिल मकरिये :याचे टेंडर का मागविले नाही.

श्री.सुरेंद्र कुलकर्णी :नियमाप्रमाणे देता येते का एवढाच खुलासा करावा.

मालमत्ता अधिकारी :त्यांची मागणी केल्यानुसार आरआर रेट प्रमाणे प्रस्तावित केले आहे.

श्री.सुरेंद्र कुलकर्णी :ठराविक संस्थेलाचा देता येते का मी हॉलची मागणी केली होती दिले नाही. मा.न्यायालयाचे अशा बाबतीत जाहिरात देवून कार्यवाही करण्याचे सूचना आहे.नियमात बसत नाही.रद्य करावे.

श्रीमती फिरदोस फातेमा खान:किती जागा देणार आहे व कोणत्या दराने आकारणी करणार यात रेट दिले नाही.यात शंका निर्माण होते.

मालमत्ता अधिकारी :सदरील संस्थेचा अर्ज प्राप्त झालेला होता.

श्री.अनिल मकरिये :जाहिरात का दिली नाही एका ठराविक संस्थेला देता येते का?

श्री.सुरेंद्र कुलकर्णी :हा ठराव नियमाने होत नाही. रद्य करावे उत्पन्न नाही सांगतात दुसरीकडे मालमत्ता देण्याचे प्रस्ताव येत असेल तर योग्य नाही.

श्रीमती फिरदोस फातेमा खान:यात शंका येत आहे.रद्य करावे पेपरला जाहिरात देऊन कार्यवाही करावी.

मा.सभापती : हा प्रस्ताव रद्द करण्यात येतो.

**<u>ठराव :</u>**

सभागृहात झालेल्या चर्चेप्रमाणे सदरचा प्रस्ताव रद्द करण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

<u>ऐनवेळचे विषय</u>

**<u>विषय क्र. 115 :</u>**

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, घनकचरा संकलन व वाहतुकीच्या कामासाठी सद्यस्थितीत महानगरपालिकेची खालीलप्रमाणे यंत्रणा कार्यरत आहे.

| वार्ड | स्कीपलोडर्स | हुकलोडर्स | ट्रक/टिप्पर्स | ॲटोटिप्पर्स | हायड्रोलिक हॉपर्स |
|---|---|---|---|---|---|
| अ | 01 | 02 | 06 | 05 | 03 |
| ब | 01 | 01 | 04 | 06 | 04 |
| क | 01 | 01 | 05 | 06 | 03 |
| ड | 01 | 01 | 03 | 08 | 02 |
| इ | 01 | 01 | 05 | 07 | 03 |
| फ | 02 | 01 | 05 | 08 | 03 |
| **एकुण** | **07** | **07** | **28** | **40** | **18** |

शहरात दररोज संकलीत होणाऱ्या जवळपास साडेचारशे मेट्रीक टन घनकचऱ्याचे संकलन व वाहतुक करण्यासाठी महानगरपालिकेची उपरोक्त यंत्रणा कमी पडत असल्यामुळे वार्ड अधिकारी यांच्या मागणीनुसार एकुण 09 खाजगी टिप्पर्स किरायाने घेण्यात आलेले आहेत. या खाजगी टिप्पर्सची मुदत दिनांक

11 मार्च 2015 पर्यंत आहे. तदनंतरच्या कालावधीसाठी नव्याने जाहिर निविदा मागवुन एजन्सी नियुक्त करणे गरजेचे आहे. सद्यस्थितीत कार्यरत टिप्पर्स प्रतिदिन प्रतिटिप्पर रूपये 3295/- दराने किरायाने घेण्यात आलेले आहेत. या दराने आगामी सहा महिने कालावधीसाठी 09 टिप्पर्स किरायाने घेण्यासाठी एकुण रूपये 46,26,180/- खर्च अपेक्षित आहे.

करीता घनकचरा व्यवस्थापनाच्या कामासाठी 09 टिप्पर्स सहा महिने कालावधी करीता किरायाने घेण्यासाठी रक्कम रूपये 46,26,180/- खर्चाचे अंदाजपत्रक मा.स्थायी समिती सभेच्या अवलोकनार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

श्री.काशिनाथ कोकाटे :ऐनवेळचे विषय मंजूर करावे.

मा. सभापती :प्रशासनाचे ऐनवेळचे सर्व विषय दुरूस्तीसह मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहरात दररोज संकलीत होणाऱ्या जवळपास साडेचारशे मेट्रीक टन घनकचऱ्याचे संकलन व वाहतुक करण्यासाठी महानगरपालिकेची उपरोक्त यंत्रणा कमी पडत असल्यामुळे, घनकचरा व्यवस्थापनाच्या कामासाठी 09 टिप्पर्स सहा महिने कालावधी करीता किरायाने घेण्यासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रूपये 46,26,180/- खर्चाचे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 116 :**

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, घनकचरा संकलन व वाहतुकीच्या कामासाठी सद्यस्थितीत महानगरपालिकेची खालीलप्रमाणे यंत्रणा कार्यरत आहे.

| वार्ड | स्कीपलोडर्स | हुकलोडर्स | ट्रक/टिप्पर्स | ॲटोटिप्पर्स | हायड्रोलिक हॉपर्स |
|---|---|---|---|---|---|
| अ | 01 | 02 | 06 | 05 | 03 |
| ब | 01 | 01 | 04 | 06 | 04 |
| क | 01 | 01 | 05 | 06 | 03 |
| ड | 01 | 01 | 03 | 08 | 02 |
| इ | 01 | 01 | 05 | 07 | 03 |
| फ | 02 | 01 | 05 | 08 | 03 |
| **एकुण** | **07** | **07** | **28** | **40** | **18** |

शहरात दररोज संकलीत होणाऱ्या जवळपास साडेचारशे मेट्रीक टन घनकचऱ्याचे संकलन व वाहतुक करण्यासाठी महानगरपालिकेची यंत्रणा कमी पडत असल्यामुळे वार्ड अधिकारी यांच्या मागणीनुसार एकुण 14 खाजगी ट्रॅक्टर्स किरायाने घेण्यात आलेले आहेत. या खाजगी ट्रॅक्टर्सची मुदत दिनांक 11 मार्च 2015 पर्यंत आहे. तदनंतरच्या कालावधीसाठी नव्याने जाहिर निविदा मागवुन एजन्सी नियुक्त करणे गरजेचे आहे. सद्यस्थितीत कार्यरत ट्रॅक्टर्स प्रतिदिन प्रति ट्रॅक्टर रूपये 1487/- दराने किरायाने घेण्यात आलेले आहेत. या दराने आगामी सहा महिने कालावधीसाठी 14 ट्रॅक्टर्स किरायाने घेण्यासाठी एकुण रूपये 32,47,608/- खर्च अपेक्षित आहे.

करीता घनकचरा व्यवस्थापनाच्या कामासाठी 14 ट्रॅक्टर्स सहा महिने कालावधी करीता किरायाने घेण्यासाठी रक्कम रूपये 32,47,608/- खर्चाचे अंदाजपत्रक मा.स्थायी समिती सभेच्या अवलोकनार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहरात दररोज संकलीत होणाऱ्या जवळपास साडेचारशे मेट्रीक टन घनकचऱ्याचे संकलन व वाहतुक करण्यासाठी महानगरपालिकेची उपरोक्त यंत्रणा कमी पडत असल्यामुळे, घनकचरा व्यवस्थापनाच्या कामासाठी 14 ट्रॅक्टर्स सहा महिने कालावधी करीता किरायाने घेण्यासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रूपये 32,47,608/- खर्चाचे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 117 :**

(अ) प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, प्रभाग अ भाग-1 वार्ड क्र.1,4,13,30,31,32, 34,35 मधिल पथदिव्यांची वार्षिक देखभाल दुरुसतीचे काम कॅाम्प्रेहेन्सीव्ह पध्दतीने मे.सोनु इलेक्ट्रीकल यांचेकडुन करुन घेण्यांत येत असुन सदर कामाची मुदत 31 मार्च 2014 पर्यन्त होती.दरम्यानच्या काळात लोकसभा, विधानसभा निवडणुका असल्याने आदर्श आचारसंहितेमुळे निविदा प्रक्रिया करता येत नसल्याने संबंधित एजन्सीला वेळोवेळी मुदतवाढ देण्यांत आली. औरंगाबाद शहरातील पथदिव्यांचे नुतनीकरण (एल.ई.डी.पथदिवे) करण्यासाठी निविदा कार्यवाही करण्यांत आली असुन सदर कामाची निविदा संबंधाने मा.सर्वोच्च न्यायालयात प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याने पथदिवे नुतनिकरणाचे काम करता आले नाही. म्हणुन संबंधित एजन्सीला माहे 31 डिसेंबर 2014 पर्यन्त मुदतवाढ देण्यांत आलेली आहे. त्यास कार्योत्तर मान्यता व्हावी.

(ब) शहरातील पथदिव्यांची देखभाल व दुरुस्तीचे काम करणा-यां ठेकेदारांनी दिनांक 19-12-2014 रोजी प्रशासनास निवेदन देवुन त्यांच्या कामाची मुदत 31 डिसें 2014 रोजी संपत असल्याचे आणि आता यापुढे काम करणेस त्यांना स्वारस्य नसल्याचे त्यांनी कळविल्यावरुन संबंधित ठेकेदारा सोबत बैठक घेण्यांत आली. त्यात झालेल्या चर्चेनुसार जुन अखेर पर्यन्त त्यांना काम करणेस सांगितले ते त्यांनी मान्य केले. तरी मे.सोनु इलेक्ट्रीकल यांना पुढील सहा महिन्यांची मुदतवाढ दिनांक 1 जानेवारी 2015 ते 30 जुन 2015 पर्यन्त देण्याबाबत तसेच वाढीव खर्च रक्कम रु.37.21 लक्ष (रु.सदोतीस लक्ष एकवीस हजार) ला मान्यता देण्यासाठी प्रशासनातर्फे शिफारस करण्यांत येत आहे. सदरचा वाढीव खर्च अर्थसंकल्प 2014-15 या वित्तीय वर्षातील विद्युत देखभाल व दुरुस्ती (शहर व उद्याने) या लेखाशिर्षकामधुन करण्यांत येईल.

(क) मा. सर्वोच्च न्यायालयात महापालिकेने काढलेल्या निविदे बाबत जो वाद (SLP No 34/29-13130/2014) सुरु आहे, त्यात महापालिकेच्या बाजूने अनुकूल निर्णय आल्यास, पथदिवे देखभाल दुरुस्तीच्या वाढीव कामाचा करार रद्द करण्याच्या अटीवर मे.सोनु इलेक्ट्रीकल यांना या कामासाठी दिनांक 1 जाने.2015 ते 30 जुन 2015 या कालावधीसाठी मुदतवाढ देण्याबाबत व त्यासाठी लागणाऱ्या खर्चास मान्यता देणेचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग अ भाग-1 वार्ड क्र.1,4,13,30,31,32, 34,35 मधिल पथदिव्यांची वार्षिक देखभाल दुरुस्तीचे काम कॅाम्प्रेहेन्सीव्ह पध्दतीने मे.सोनु इलेक्ट्रीकल यांचेकडुन करुन घेण्यांत येत असल्यामुळे व सदर कामाची मुदत 31 मार्च 2014 ला संपल्याने संबंधित एजन्सीला माहे 31 डिसेंबर 2014 पर्यन्त दिलेल्या मुदतवाढीस कार्योत्तर मान्यता देण्यांत येते. तसेच शहरातील पथदिव्यांची देखभाल व दुरुस्तीचे काम करण्यासाठी संबंधित ठेकेदारा सोबत झालेल्या चर्चेनुसार त्यांना पुढील सहा महिन्यांची मुदतवाढ दिनांक 1 जानेवारी 2015 ते 30 जुन 2015 पर्यन्त देण्यास तसेच रक्कम रु.37.21 लक्ष (रु.सदोतीस लक्ष एकवीस हजार) च्या वाढीव खर्चास मान्यता देण्यांत येते. तसेच मा.सर्वोच्च न्यायालयात महापालिकेने काढलेल्या निविदे बाबत जो वाद (SLP No 34/29-13130/2014) सुरु आहे, त्यात महापालिकेच्या बाजूने अनुकूल निर्णय आल्यास, पथदिवे देखभाल दुरुस्तीच्या वाढीव कामाचा करार रद्द करण्याच्या अटीवर सदर काम मे.सोनु इलेक्ट्रीकल यांना देण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 118 :**

(अ) प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, प्रभाग अ भाग-2 वार्ड क्र.5,6,7,8,9,10,11,12 मधिल पथदिव्यांची वार्षिक देखभाल दुरुसतीचे काम कॅाम्प्रेहेन्सीव्ह पध्दतीने मे.असंसो लाईट्स यांचेकडुन करुन घेण्यांत येत असुन सदर कामाची मुदत 31 मार्च 2014 पर्यन्त होती. दरम्यानच्या काळात लोकसभा,विधानसभा निवडणुका असल्याने आदर्श आचारसंहितेमुळे निविदा प्रक्रिया करता येत नसल्याने संबंधित एजन्सीला वेळोवेळी मुदतवाढ देण्यांत आली. औरंगाबाद शहरातील पथदिव्यांचे नुतनीकरण (एल.ई. डी पथदिवे) करण्यासाठी निविदा कार्यवाही करण्यांत आली असुन सदर कामाची निविदा संबंधाने मा.सर्वोच्च न्यायालयात प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याने पथदिवे नुतनिकरणाचे काम करता आले नाही. म्हणुन संबंधित एजन्सीला माहे 31 डिसेंबर 2014 पर्यन्त मुदतवाढत देण्यांत आलेली आहे. त्यास कार्योत्तर मान्यता व्हावी.

(ब) शहरातील पथदिव्यांची देखभाल व दुरुस्तीचे काम करणाऱ्यां ठेकेदारांनी दिनांक 19-12-2014 रोजी प्रशासनास निवेदन देवुन त्यांच्या कामाची मुदत 31 डिसें 2014 रोजी संपत असल्याचे आणि आता यापुढे काम करणेस त्यांना स्वारस्य नसल्याचे त्यांनी कळविल्यावरुन संबंधित ठेकेदारा सोबत बैठक घेण्यांत आली. त्यात झालेल्या चर्चेनुसार जुन अखेर पर्यन्त त्यांना काम करणेस सांगितले ते त्यांनी मान्य केले. तरी मे.असंसो लाईट्स यांना पुढील सहा महिन्यांची मुदतवाढ दिनांक 1 जानेवारी 2015 ते 30 जुन 2015 पर्यन्त देण्याबाबत तसेच वाढीव खर्च रक्कम रु.35.04 लक्ष (रु.पस्तीस लक्ष चार हजार) ला मान्यता देण्यासाठी प्रशासनातर्फे शिफारस करण्यांत येत आहे.सदरचा वाढीव खर्च अर्थसंकल्प 2014-15 या वित्तीय वर्षातील विद्युत देखभाल व दुरुस्ती ( शहर व उद्याने ) या लेखाशिर्षकामधुन करण्यांत येईल.

(क) मा.सर्वोच्च न्यायालयात महापालिकेने काढलेल्या निविदे बाबत जो वाद (SLP No 34/29-13130/2014) सुरु आहे, त्यात महापालिकेच्या बाजूने अनुकूल निर्णय आल्यास, पथदिवे देखभाल दुरुस्तीच्या वाढीव कामाचा करार रद्द करण्याच्या अटीवर मे.असंसो लाईट्स यांना या कामासाठी दिनांक 1 जाने 2015 ते 30 जुन 2015 या कालावधीसाठी मुदतवाढ देण्याबाबत व त्यासाठी लागणाऱ्या खर्चास मान्यता देणेचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

